‘ २ नट - नटांचे शिक्षण

शिक्षण दोन प्रकारचे - (१) लौकिक शिक्षण - वर्तन, (२) कलेचे शिक्षण - अभिनय.
मराठी रंगभूमीच्या जन्मकाळापासून नाट्यव्यवसायात जी माणसे शिरली ती बहुतेक सगळी अशिक्षित आणि हलक्या प्रकारची कामे करणारी होती. श्री. विष्णुदास भावे यांना आचारी, पाणके अशाच प्रकारच्या लोकांना हाताशी धरून या क्षेत्रातली पहिली पावले टाकावी लागली आहेत. सुरूवातीला या गोष्टींबाबत त्यांचा नाईलाज होता, परंतु पुढे सुद्धा त्यांनी नटांवर संस्कार करण्याचा प्रयत्न केला नाही. याबद्दल रंगभूमी नियतकालिकाचे संपादक श्री. शं. बा. मुजुमदार यांनी त्यांना दोष दिला आहे.

१९०७ च्या मे महिन्यापासून पुण्याला, महाराष्ट्र-नाटक मंडळीने प्रत्येक रविवारी नाट्यचर्चा घडवून आणण्याचा उपक्रम सुरू केला होता. त्यामध्ये नाटकाचा व्यवसाय Drama as a profession या विषयावर श्री. शं. बा. मुजुमदार यांचे झालेले भाषण वर्ष १, अंक १०, मे १९०८ च्या रंगभूमीच्या अंकात छापलेले आहे. त्यात ते म्हणतात, आपल्या देशात नाटकाच्या धंद्याला प्रतिष्ठा नाही हे दुर्दैव आहे. पाश्चात्य देशात हेन्री आयर्व्हिंगला ‘ सर ही पदवी मिळते. विष्णुदास भावे यांनी या कलेला उच्च स्थान मिळवून दिले नाही, कुलीनपणाचे स्वरूप दिले नाही, हा त्यांचा दोष आहे. अण्णासाहेब किर्लोस्कर यांनी या धंद्याला प्रतिष्ठा मिळवून दिली. नटाला महत्त्वाकांक्षा हवी. धंद्याचा इतिहास ठाऊक हवा. कलेचे ज्ञान हवे. याच अंकात कृ. प्र. खाडिलकर व विश्वनाथ अनंत केसकर यांचीही भाषणे दिलेली आहेत. नटाने आपली पात्रता वाढवून मान मिळवावा असे श्री. कृ. प्र. खाडिलकर यांनी सांगितले आहे. श्री. केसकर यांनी नटांच्या शिक्षणाबाबत अधिक विस्तृत विवेचन केले आहे. ते म्हणतात नटांनी व्यसनमुक्त असले पाहिजे. गॅरिक सुशिक्षित होता म्हणून त्याला शेक्सपीअर कळू शकला. नटांना शिक्षण देणे आवश्यक आहे. ते चार प्रकारचे असावे. -

(१) धर्म व नीती यांचे ज्ञान
(२) संस्कृत, मराठी, इंग्रजी या भाषांचे ज्ञान
(३) इतिहास - विशेषेकरून आपल्या देशाच्या इतिहासाचा परिपाठ
(४) नाट्यशास्त्र

या विवेचनात श्री. केसकर यांनी हॅम्लेट नाटकातील एक उदाहरण अचूकपणे दिले आहे. ‘हॅम्लेट नाटकात दुसऱ्या अंकाच्या दुसऱ्या प्रवेशात नाटक मंडळी आली असता त्यांना उद्देशून हॅम्लेटने काही विचार प्रगट केले आहेत ते महत्त्वाचे आहेत. हॅम्लेटचा रोख असा आहे की नाटक मंडळींनी मार्मिक प्रेक्षकांना संतुष्ट करण्याची शिकस्त करावी. तसेच तिसऱ्या अंकाच्या दुसऱ्या प्रवेशात नाटक मंडळीला बोलावून आणून तिच्याकडून आपल्या चुलत्यासमोर एक नाटक करण्याचा बेत तो सांगतो. नाटक चांगले वठण्याकरिता काय काय गोष्टी ध्यानात ठेवाव्या इ. बाबतचे हॅम्लेटचे बोलणे महत्त्वाचे आहे.

श्री. केसकर यांनी व्यक्त केलेले विचार त्यांच्या व्यासंगाचे व चिंतनशीलतेचे निदर्शक आहेत. परंतु हॅम्लेट नाटक कळण्याइतकी क्षमता असलेले नट त्याकाळी किती होते हा प्रश्न पडतो. आपल्या वाचनाचा, व्यासंगाचा उपयोग आपल्या नाट्यक्षेत्राला कसा करून घेता येईल ही मार्मिक दृष्टी मात्र अभिमानास्पद आहे. ‘हॅम्लेट नाटकाच्या अभ्यासाचा संदर्भ आपल्या नट व नाटक मंडळींच्या विकासाला कारणीभूत ठरू शकेल, त्यांना कलेची दृष्टी देऊ शकेल असा विचार व्यक्त करणे हेच खूप मोलाचे आहे. नटांना जे चार प्रकारचे शिक्षण आवश्यक आहे असे सांगितले आहे त्याचे महत्त्व वादातीत आहे. आजही या प्रकारच्या अभ्यासाची आवश्यकता आहे.

माजात नटाची जागा या निनावी लेखात (वर्ष १, अंक २/३, सप्टें-ऑक्टों. १९०७) नटाने, मनोरंजनाद्वारे लोकशिक्षण देण्याचे कार्य फार जोखमीचे आहे असा विचार मांडला आहे. नटांवरील जबाबदारीची जाणीव त्यांना इथे करून दिली आहे. ही जबाबदारी पार पाडण्यासाठी, चांगला नट होण्यासाठी स्वभाषेचे ज्ञान, अभिनयगुण, उत्तम शरीरप्रकृती, रूप, आवाज, निरीक्षण, चारित्र्य हे सारे आवश्यक आहे. हा विचार मांडला आहे.

नाट्यशिक्षणाचे धडे - धुलाक्षर या लेखात (वर्ष १, अंक ४, नोव्हें. १९०७) अंगविक्षेप करून प्रेक्षकांना चाळविणाऱ्या नटांचा अधिक्षेप केला आहे. याच लेखात प्रयोगाच्या वेळी नटाने कसे असावे याबद्दल, वरवर सामान्य वाटणाऱ्या पण महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. लेखक सांगतो, नटाने प्रयोगाच्या वेळी आपली तयारी चांगली ठेवावी. प्रसंगावधान ठेवावे. फार खाऊ नये, उपाशी असू नये, कोणाशी बोलू नये, झोप घेऊ नये, तंबाखू खाऊ नये, विडी पिऊ नये, अमंगळ राहू नये, खिन्न किंवा उदासीन असू नये. या गोष्टी व्रताप्रमाणे पाळणे आवश्यक आहे.

व्यावहारिक स्वरूपाचा हा सूक्ष्म तपशीलवार उपदेश नटाच्या जडणघडणीस खूपच उपयुक्त आहे. नाट्यसेवा हे एक व्रत आहे याची जाणीव करून दिलेली आहे. त्यावरून या कलेकडे पाहाण्याचा विचारी माणसांचा दृष्टिकोन कसा होता ते कळते.

नटांच्या अंगविक्षेपांच्या संदर्भात श्री. रामचंद्र गोविंद दंडवते यांनी ‘ सामाजिक बहिष्कारच पाहिजे या लेखातही विवेचन केले आहे. (वर्ष २, अंक ५/६/७, डिसें. १९०८ व जाने-फेब्रु. १९०९)

श्री. दंडवते यांच्या मते नाट्यकला हा व्यक्तीचा विषय नसून समाजाचा विषय आहे. नाट्यकला ही समाजाची संपत्ती आहे. म्हणूनच नाटककार व नट यांच्याकडून तिचा अपव्यय होऊ लागला तर त्याविषयी विचारण्याचा हक्क सर्वांनाच आहे. रेवतीसारख्या पात्रांच्या नीच कल्पना आणि नेत्रकटाक्षांचे अनुकरण साधारण प्रेक्षक करतो. अशा तऱ्हेची अश्लीलत्वदर्शक पात्रे नाटकात घालणे अयोग्य आहे असे म्हणून त्यांनी नटापेक्षाही नाटककाराला अधिक दोष दिला आहे. चांगले नाटक करण्यास सांगण्यासाठी नटांना शिक्षण देण्याची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. वर्ष ३, अंक २/३, सप्टें/ऑक्टो. १९०९ या अंकात ‘ नाट्यविषयक चर्चा या शीर्षकाखाली ‘ नट व शिक्षण या विषयासंबंधी लिहिताना श्री. रा. गो. दंडवते यांनी नटांच्या दोन प्रकारच्या शिक्षणाची आवश्यकता सांगितली आहे. नाटक मंडळीत बहुतेक मुले घरातून पळून आलेली असतात. त्यांच्या शालेय स्वरूपाच्या शिक्षणाची व्यवस्था नाटक मंडळीत झाली पाहिजे, त्याचप्रमाणे त्यांना नाटक या व्यवसायाचेही शिक्षण दिले गेले पाहिजे.

त्या काळातील समस्या व गरजा यांची कल्पना या सर्व विवेचनावरून येते. नाटक मंडळी हे एक कुटुंबच असल्यासारखे असे. नाटक कंपनीच्या व्यवस्थापकाला अनेक प्रकारचे व्यवधान सांभाळावे लागे. अशा बिकट परिस्थितीत कला व व्यवसाय या दोन्ही दृष्टीने कामगिरी बजावणे ही अवघडच गोष्ट होती.

श्री. अनंत वामन बरवे यांनी ‘ नाट्यशिक्षणपध्दती या लेखात (वर्ष २, अंक ४, नोव्हें. १९०८) नटांच्या सशास्त्र शिक्षणपद्धतीचा पुरस्कार केला आहे.

नाट्यकलेला सशास्त्र शिक्षणपध्दती व तशा शिक्षणपध्दतीला अनुसरून शिक्षण देणारी संस्था नाही. त्यामुळे नाट्यकलेला प्रतिष्ठा नाही. नटविद्या (अभिनय) ही शिकवून येणारी आहे का याबाबत मतभेद आहेत. Poets are born याप्रमाणे नटही जन्माला यावा लागतो असे काहींचे मत अहे, पण शिक्षण आणि परिश्रमाने खूप काही साधता येते. या संदर्भात पाश्चात्य देशातील एका संस्थेचे उदाहरण दिले आहे. Conservatoire of Paris या नावाच्या फ्रान्समधील संस्थेच्या हेतू विषयी म्हटले आहे.

‘does not giveThe conservatoire genius to those who have it not but it teaches the art of employing one's natural gifts the science of diction, the use of gesture, how to control and develop the voice, and how to penetrate into the psychology of a personage and of a part .’ (वर्ष २, अंक ४, नोव्हें. १९०८ ‘नाट्यशिक्षणपद्धती पृ. २)

पाश्चात्य व्यक्ती व संस्था यांची अशा प्रकारची आणखीही उदाहरणे लेखकाने दिलेली आहेत.

लेखक म्हणतो, नटविद्येच्या अभ्यासक्रमात एके जागी बसून होणाऱ्या लेखन, वाचन, आणि पाठांतर या साधनांपेक्षा अवलोकन आणि अनुकरण या साधनांचा अधिक उपयोग असतो हे खरे. आणि अवलोकन अनुकरणासाठी पाठशाळेच्या विविक्षित परिमित जागेपेक्षा बाजार, देवस्थाने, चव्हाटे, पाणवठे इ. असंख्य लोक एकत्र जमण्याच्या जागाच अधिक अनुकूल. म्हणून पाश्चात्य नट गॅरिक याची नाट्यकलेच्या अभ्यासाची विशेष आवडती जागा म्हणजे चहा-कॉफी पिण्याची विलायतेतील त्यांच्यावेळची पानगृहे किंवा पिठ्ठे होत असे त्याच्या चरित्रात सांगितले आहे. तरीही नटविद्येच्या पूर्णतेसाठी नाट्यशिक्षण देणारी एखादी संस्था असावी तिचा दीड-दोन वर्षांचा अभ्यासक्रम असावा व त्यात आंगिक, वाचिक, सात्त्विक, आहार्य असा सर्व प्रकारचा अभिनय पद्धतशीरपणे शिकविला जावा असे स्पष्ट मत लेखकाने दिले आहे. यावरून रंगभूमी नियतकालिकात लेखन करणारे लेखक किती दूरदृष्टीचे होते, हे दिसून येते. नाट्यकला हा अभ्यासविषय होऊ शकतो ही दृष्टी ज्या काळात समाजात निर्माण झालेली नव्हती त्याकाळात नाट्यशिक्षण देणारी संस्था उभारली जाण्याचे स्वप्न पाहाणे हा अस्सल नाट्यप्रेमाचा आणि निकोप नाट्यदृष्टीचा पुरावा आहे.

श्री. शंकर रामचंद्र कानिटकर यांनी ‘ पत्रव्यवहार या सदरात ‘न टांचे वर्तन या शीर्षकाखाली नटाच्या शिक्षणाविषयी विचार व्यक्त केले आहेत. (वर्ष ३, अंक ६/७, जाने-फेब्रु. १९१०)

ले खक म्हणतो नटांचे मॅटिक्युलेशनपर्यंत तरी शिक्षण हवे. नाट्यविषयावरील इंग्रजीतील वाङ्मय वाचण्यासाठी शिक्षणाची जरूरी आहे. नटाने नाट्य विषयाचा सतत व्यासंग केला पाहिजे. त्याने शील घडविले पाहिजे. त्याने सभ्य माणसास साजेसा पोशाख करावा. व्यसन व व्यसनी माणसे यांपासून दूर राहावे. स्वत:चा शब्द खरा करण्याची वृत्ती, सुशिक्षित समाजाशी संबंध, नीतिमत्ता इकडे लक्ष द्यावे.

नाट्यविषयाची चर्चा करणारी जी मासिके, पुस्तके असतील त्यात नटांचे स्वत:चे लेख आले पाहिजेत. त्यातून त्यांनी लोकांमध्ये नाट्यविषयक अभिरूची वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

ज्या नाटक मंडळीत नट प्रथम शिरला असेल त्यातच त्याने राहावे. कंपनी बदलू नये. आपल्या नाटक मंडळींबद्दल त्याला विश्वास व प्रेम वाटले पाहिजे.

नटाने आपल्या उत्पन्नाचा चौथा हिस्सा तरी शिलकीत टाकला पाहिजे, हा विचारही येथे येतो. याचा संबंध नटांच्या व्यसनीपणाशी, कर्जबाजारीपणाशी आहे, म्हणजेच अखेर नटशिक्षणाशी आहे.

या विवेचनावरून, नटाला, नट म्हणून आणि माणूस म्हणून, दोन्ही दृष्टीने घडविण्याची किती निकड विचारी माणसांना वाटत होती ते दिसते. रंगभूमी नियतकालिकाचा उदय झाला नसता तर कदाचित हे, नाट्यकलेच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे, नटांच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे विचार इतक्या प्रभावीपणे प्रगटही झाले नसते

३ नाट्यकलेची सुधारणा करण्याची जबाबदारी कोणावर ?

नाट्यकलेतील तीन महत्त्वाचे घटक म्हणजे नाटककार, नट, व प्रेक्षक यापैकी नाट्यकलेची प्रगती करण्याची जबाबदारी कोणावर याविषयी रंगभूमी नियतकालिकात काही मते मांडलेली आहेत.

सामाजिक बहिष्कारच पाहिजे या आपल्या लेखात श्री. रा. गो. दंडवते म्हणतात, (वर्ष २, अंक ५/६/७ डिसेंबर १९०८, जाने/फेब्रु. १९०९) की नाटकाची उन्नती वा अवनती प्रथम नाटककारावर अवलंबून असते व मग नटावर. नट हे केवळ साधनीभूत आहेत. नाटक हे समाजसुधारणेचे साधन आहे. समाजोन्नती झाली म्हणजे देशोन्नती होईल, म्हणून नाटककाराचे कर्तव्य म्हणजे समाजसुधारणेसाठी नाटके लिहिणे, आज पैशावर डोळा ठेवून नाटककार नाटके लिहितात. नटांकरिता नाटककार नाहीत तर नाटककारांकरिता नट आहेत. नाटक मंडळीच्या मागणीप्रमाणे नाटककाराने नाटक लिहून देणे लांछनास्पद आहे.

ंरगभूमी नियतकालिकात लेखन करणारे श्री. रा. गो. दंडवते हे डेक्कन कॉलेजमध्ये विद्यार्थी होते. त्यांच्या लेखनातून व्यक्त झालेले विचार तरुणपिढीच्या मताचे निदर्शक मानायला हरकत नाही. समाज सुधारणा हे नाट्यकलेचे अंतिम ध्येय मानण्याचा तो काळ होता. समाज व देश यांची प्रगती हा दृष्टिकोन प्रभावी होता. कला हे साधन मानले जात असल्याने कलेची स्वतंत्र प्रतिष्ठा, स्वयंभू मूल्य याबाबतचे विचार फारसे कोणी व्यक्त करीत असल्याचे दिसत नाही. नाटककाराचे महत्त्व एक कलावंत म्हणून वाटत नाही आहे तर समाजाला मार्गदर्शन करू शकणारा एक घटक म्हणून त्याच्याकडे पाहिले जात आहे.

अाधुनिक नाट्यकलेवर दोन विचार या ‘स्फुट विवेचन या सदरातील लेखातही असेच विचार व्यक्त केले आहेत. (वर्ष २, अंक ८/९/१०, मार्च/एप्रिल/मे १९०९)

ले खक म्हणतो, हल्ली नाटककार ‘ समाजसुधारणेकरिता लिहिलेले नाटक अशी स्वत:चीच जाहिरात करतात. ती प्रेक्षकांच्या हक्काची पायमल्ली आहे. नाटकाची जात, प्रत, परिणाम ठरविण्याचे काम, हक्क हा प्रेक्षकांचा असतो.

या लेखातील हा विचार मान्य होण्यासारखाच आहे. नाटकाचा हेतू जाहीर करण्यापेक्षा तो प्रेक्षकांना आपोआप कळणे महत्त्वाचे असते. दुसरे म्हणजे स्वत:हून नाटककाराने आपल्या नाटकावर एखादा छाप (श्ररलश्रश) मारणे ही प्रवृत्ती योग्य नव्हे. नाटककारानेच काय पण

कोणीच कलाकृतीवर छाप मारू नये. परंतु हा विचार बऱ्याच पुढच्या काळात मांडला गेला. येथे फक्त प्रेक्षकांच्या हक्काच्या संदर्भात तो व्यक्त केला गेला आहे.

लेखक पुढे म्हणतो, किर्लोस्करांनंतर हळूहळू नाटकाची अवनतीच होते आहे. किर्लोस्करांनंतरच्या नाटककारांनी नाटक हे पैसे मिळविण्याचे साधन केले. खूप पैसे मिळाल्यावर नाटक हे समाजसुधारणेचे एक साधन आहे हे ते विसरून गेले. नाटकाच्या यशापयशाची मुख्य जबाबदारी नाटककारांवर आहे. नट हे एक साधन आहे.

नादान कोण , नट, नाटके, रंगभूमी की व्यवस्थापक या लेखात ' भारतनाट्यसेवक या टोपण नावाने काही विचार व्यक्त केले आहेत. (रंगभूमी नवी आवृत्ती मे १९२७, अंक २)

नट, नाटके आणि रंगभूमी या तीन गोष्टी संस्थेचा चालक संभाळतो पण व्यवस्थापकाला समाजाची सूत्रे सांभाळावी लागतात. गेल्या बारा वर्षात अभिमानास्पद नवे नाटक आले नाही. नाट्यकलेच्या अध:पतनाला लेखकवर्ग जबाबदार आहे. नाट्यसंस्था व प्रेक्षक वर्गही जबाबदार आहे. या परिस्थितीत सुशिक्षित नटांवर अधिक जबाबदारी आहे.

नाट्यकलेच्या विकासाची जबाबदारी ही कोणा एका घटकाची नसून ती सामुदायिक स्वरूपाची आहे ही जाणीव येथे व्यक्त झालेली दिसते. १९२७ मध्ये लिहिलेला हा मजकूर आहे आणि गेल्या बारा वर्षात म्हणजे १९१५ते १९२७ या काळात चांगले नाटक निर्माण झाले नाही असे म्हटले आहे. वास्तविक राम गणेश गडकरी यांची नाटके याच काळातली आहेत. ' एकच प्याला हे त्यांचे सर्वश्रेष्ठ मानले गेलेले नाटक १९१९ मध्ये रंगभूमीवर आले होते. पण त्यावेळपर्यंत त्याची महत्ता कळलेली नव्हती नाट्यसमीक्षेच्या वाटचालीच्यादृष्टीने अशी विधाने लक्षात घेण्याजोगी ठरतात.

४ नाटकाचा समाजावर होणारा परिणाम

नाटक हे समाज सुधारणेचे, नीतिशिक्षणाचे साधन मानले जात होते हे रंगभूमी नियतकालिकातील लेखांमध्ये अनेक वेळा स्पष्ट झालेले आहे. नाटक कोणत्या प्रकारे नीतिशिक्षण देते या संबंधीचा विचारही आलेला आहे. पण नाटक पाहिल्याबरोबर समाज सुधारणा होत नाही, अनिष्ट सामाजिक रूढी लगेच नष्ट होत नाहीत ही जाणीवही दिसते. कृ.

आ. गुरुजी यांनी तर असे मत व्यक्त केले आहे कील समाजाच्या स्थित्यंतरास नाटके साधनीभूत आहेत पण त्यांस प्राधान्य देता येत नाही. नाटकाला जर प्राधान्य द्यायचे असेल तर ते प्रासंगिक नाटकांस प्रसंगापुरते देता येईल. ते म्हणतात, डॉक्टर व वैद्य यांच्यासंबंधाने चाललेला कडाक्याचा वाद, स्थानिक स्वराज्याची देणगी, स्त्रियांकरिता हायस्कूलची स्थापना, कोल्हापूर प्रकरण, मल्हारराव प्रकरण, संमतिवयाच्या बिलासंबंधाने बनलेले पक्ष व माजलेले रण ही तत्कालीन नाट्यकवींस पर्वणीच होती. (भारतनाट्यसमाजाचे आठवे वार्षिक संमेलन - कृ. आ. गुरुजी, वर्ष ५, अंक ५/६, डिसेंबर १९१२)

नाटकाला प्रासंगिक महत्त्व असते, नाटकाचा परिणाम त्या त्या काळापुरताच असतो हे श्री. गुरुजी यांचे मत मर्यादित अर्थाने खरे आहे असे म्हणावे लागते. नाटकात जर शाश्वत वाङ्मयीन मूल्यांचा आविष्कार असेल तर विषय तात्कालिक असला तरी नाटकाचा परिणाम खोलवर आणि प्रदीर्घ काळपर्यंत टिकून राहतो तसे जर नसेल तर विशिष्ट प्रश्न संपले की ते नाटकही काळाच्या पडद्याआड जाते. म्हणूनच, बाजारभावाने ज्यांची किंमत बदलते अशी नाटके न लिहिण्याकडे आमच्या नाटककारांचा कल असावा, प्रयत्न असावेत, अशी सूचना रंगभूमीकारांनी केली आहे. ('रंगभूमीचे पाचवे वर्ष - वर्ष ६, अंक १, १९१४)

नाटकांचा समाजमनावर परिणाम निश्चित होतो. परंतु तो मनोविकारांच्या द्वारे होतो. सावकाश होतो. चिरस्थायी स्वरूपाची जीवनमूल्ये, नाट्यमूल्ये असलेली नाटके पिढ्यानुपिढ्या टिकून राहतात हा मतितार्थ या विवेचनातून निघतो.

(क) तत्कालीन एक महत्त्वाचा नाट्यविषयक प्रश्न - कुलीन स्त्रियांनी रंगभूमीवर भूमिका कराव्या की करू नयेत -

रंगभूमी नियतकालिकाच्या काळात स्त्रिया आणि रंगभूमी हा प्रश्न उपस्थित झाला, याचे कारण बंगाली रंगभूमीवर स्त्रिया, स्त्रीभूमिका करीत होत्या हे असावे. महाराष्ट्रात आणि बाहेरही बेळगावकर स्त्री संगीत मंडळी प्रयोग करीत होतीच पण या दोन्ही ठिकाणी प्रतिष्ठित स्त्रिया रंगभूमीवर येत नव्हत्या. म्हणून या चर्चेबाबत 'कुलीन या विशेषणाला महत्त्व देऊन बहुतांशी विरोधी सूर सर्वांनी व्यक्त केला आहे. वास्तविक १९१३ मध्ये गंधर्व नाटक मंडळीची स्थापना झाली होती. त्याआधीपासूनच बालगंधर्व कीर्तीच्या शिखरावर होते.

प्रेक्षकांना त्यांच्या स्त्रीभूमिकांची अवीट गोडी मान्य होती. तरीही १९१५ मध्ये रंगभूमीकारांना, स्त्रियांनी स्त्रीभूमिका करण्याबाबतचा प्रश्न विचारपूर्वक पुढे ठेवावा लागला याचा अर्थ त्यांनी काळाची पावले ओळखली होती. पुरुषांनी स्त्रीभूमिका करण्यातली अनैसर्गिकता कुठेतरी जाणवत असलीच पाहिजे. नीच कुलातल्या स्त्रियांशी नाटक मंडळींचा संपर्क वाढणे हितावह नाही ही गोष्ट सुद्धा स्पष्ट दिसत होती. स्वत: रंगभूमीकारांना, कुलीन स्त्रियांनी भूमिका करणे अमान्यच होते तरीही या प्रश्नाचा सर्व बाजूंनी विचार करणे त्यांना अगत्याचे वाटलेले आहे आणि म्हणून त्यांनी या प्रश्नाला चालना दिलेली आहे.

नाटकात स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांनीच केल्या पाहिजेत काय या विषयावर रंगभूमी वर्ष ६, अंक ७, दि. १/१२/१९१५ च्या अंकात काही प्रश्न पुढे ठेवून रसिकांचे, विद्वानांचे अभिप्राय मागविलेले आहेत. प्रश्न असे आहेत.

(१) स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांनी केल्या पाहिजेत काय ?

(२) हल्ली नाटकातून स्त्रियांच्या भूमिका पुरुष करतात म्हणून कलेच्या दृष्टीने त्यात काही व्यंगे आहेत काय ?

(३) आपली समाजस्थिती या सुधारणेला अनुकूल आहे काय ?

(४) गायकांचा उपयोग नाटकात केल्याने कलेची उन्नती होऊन धंद्यास काही प्रतिष्ठा येईल काय ?

(५) हल्ली नाटकीय वर्ग समाजापासून दूर टाकल्यासारखा आहे, तो स्त्रियांचा उपयोग नाटकात करू लागल्यापासून समाजाच्या निकट सहवासाला पात्र होईल काय ?

(६) समाज या नवीन सुधारणेचा कसा काय उपयोग करून घेईल

(७) नाटकात बायका घ्यायच्या त्या विवाहित, कुमारिका, कुलीन का दुसऱ्या कोणत्या ?

वर्ष ६, अंक ८, १९१६, पृष्ठ १ ते ८ या अंकात काही विद्वानांकडून आलेले अभिप्राय छापले आहेत ते क्रमाने पाहू.

(१) श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनी याबाबत मांडलेले विचार -

(१) स्त्रियांच्या भूमिका पुरुषांनी करण्यापेक्षा स्त्रियांनी करणे हेच कलेच्या दृष्टीने इष्ट आहे. पण स्त्रीभूमिकेस आवश्यक असणारी शारीरिक व मानसिक सिद्धता पुरुषवर्गीय नटाच्या अंगी एकाच वेळी असणे शक्य नाही. लहान वय असेपर्यंत स्त्रीवेष शोभतो व स्त्रीशी सादृश्य दिसू शकते पण त्या वयात अनुभवशून्यतेमुळे कोमल मनोवृत्तीचा आविर्भाव योग्य रीतीने दाखविण्याची कला त्याला अवगत नसते. वयाच्या प्रौढतेबरोबर ही कला अवगत होते पण शरीर बेडौल व आवाज कर्कश होऊ लागतो. स्त्रीभूमिका शोभेनाशी होते.

स्त्रीभूमिका करण्याच्या सवयीमुळे रोजच्या बोलण्या-चालण्यातही स्त्रीपाटीची झाक येते हा एक दोष आहे.

(२)स्त्रियांची कामे स्त्रियांनी करावी हे तात्त्विकदृष्टीने कितीही इष्ट असले तरी आपल्या समाजस्थितीचा विचार करता ते कुलीन स्त्रियांनी तरी व्यवहारात आणणे सोपे नाही. कुलीन स्त्रियांना रंगभूमीवर कामे करताना पहाण्याची सवय नसलेल्या लोकांकडून त्यांच्या शीलाबद्दल कंड्या उठतील व त्या त्यांच्या भीरू व कोमल स्वभावास मुळीच खपणार नाही. आपल्याकडे स्त्री-पुरुषांच्या मिश्र मेळाव्याची प्रथा नाही. तशा प्रथेत स्त्रियांना स्वत:च्या शीलाचे संरक्षण करण्याचे सामर्थ्य येते व पुरुषात स्त्रियांना आदराने वागविण्याची प्रवृत्ती निर्माण होते. एका पुरुषाच्या पत्नीने दुसऱ्या पुरुषाच्या पत्नीचा अभिनय करणे त्या पुरुषाला व प्रेक्षकांना मान्य होणार नाही. खऱ्या संसारातील पतिपत्नी रंगभूमीवरही पतिपत्नीचे नाते ठेवीत गेल्यास ही सुधारणा अंमलात येणे शक्य आहे. कोणत्याही कुलीन स्त्रीस नाटकापुरते का होईना नायकीण म्हणून घेणे कधीही पसंत पडणार नाही.

(४) नाटकात बायकांनी कामे केल्याने कलेचा फायदाच होईल हे वर दर्शविलेच आहे. (काय दर्शविले आहे उलट तोटे व अडचणीच सांगितल्या आहेत.) त्या बायका जितक्या सुशिक्षित व नीतिमान असतील त्या मानाने नाटकाच्या धंद्यासही प्रतिष्ठा राहील. परंतु नाटकाचा धंदाच जात्या वृत्तिचांचल्यास इतका अनुकूल आहे की त्यात पडलेल्या बहुतेक इसमांची नीतिमत्ता फार दिवस अढळ राहणे अशक्य नसले तरी संभनीय नाही.

(५) हल्ली नाटकीय वर्ग समाजापासून पूर्णपणे दूर टाकल्यासारखा आहे असे मला वाटत नाही. तसा तो काही वर्षापूर्वी होता, पण नाटक मंडळीत सुशिक्षणाचा व नीतीचा प्रसार झाल्यापासून ही स्थिती बदलत चालली आहे.

(६) केवळ नाटकात स्त्रिया कामे करतात या गोष्टीचा समाजावर परिणाम काही रंगेल व्यक्तींना नादी लावण्यापलीकडे फारसा होणार नाही. त्या अभिनय कुशल असतील तर उत्तम अभिनयकुशल पुरुषवर्गीय नटाप्रमाणे आपल्या अभिनयाच्याद्वारे परिणामकारक होतील. त्या नीतिमान् असतील तर हल्ली नाटकगृहात प्रेक्षकांमध्ये जो पाचकळपणा कधी कधी दिसून येतो त्यास बराच आळा बसेल. त्या सुशिक्षित व उत्तम वक्त्या किंवा लेखिका असतील तर त्यांस व्याख्यानांच्या, किंवा लेखांच्या द्वारे समाजाची सेवा करता येईल. अशा नटींनी समाजातील व्यक्तींशी विवाह केल्यास समाजात ललित कलांची वृध्दीही होईल

(७) नाटकात स्त्रिया घ्यायच्या त्या कुमारिका, विवाहित यापैकी कोणत्याही वर्गाच्या असल्या तरी चालेल. कुलीन मिळाल्यास उत्तमच, न मिळाल्यास साधारण बऱ्या नीतिमत्तेच्या वेश्यांवर निर्वाह करावा लागेल. अशा वर्गामुळे पुरुषवर्गीय नटांची नीतिमत्ता बिघडण्याची भीती आहे. परंतु पुष्कळ नटांच्या बाबतीत ती हल्ली असते त्यापेक्षां फारशी बिघडण्याचा संभव नाही. व बिघडली तरी ते नट पुरुष असल्यामुळे त्यांस उजळ माथ्याने वावरण्यास समाजाने पूर्ण अधिकार ठेवला आहे. कालपरत्वे ते सुशिक्षित होत जातील व नीतिमान् वेश्या किंवा कुलीन स्त्रिया नटी म्हणून रंगभूमीवर यावयास लागतील, तेव्हा पुरुषवर्गीय नटांची नीती आपोआपच सुधारणार आहे.

श्री. कृ. कोल्हटकर यांनी स्त्रियांनी रंगभूमीवर कामे करण्यास हरकत नाही. हा विचार फक्त तात्त्विक पातळीवरच मान्य केलेला दिसतो. व्यवहारातील अनेक अडचणींचे वर्णन करून अद्याप (हा लेख दि. १५-२-१९१६ चा आहे) आपल्याकडे स्त्रियांनी रंगभूमीवर कामे करण्यासारखे वातावरण नाही हे त्यांनी दाखविले आहे. ‘‘बऱ्या नीतिमत्तेच्या वेश्या ’ म्हणजे नेमके काय ते कळू शकत नाही. पुरुष नटांना आत्ताही नीतिमत्ता नाहीच तेव्हा स्त्रिया रंगभूमीवर आल्यामुळे ती बिघडण्याची शक्यता नाही हे त्यांनी स्पष्टपणे सांगून टाकलेले आहे. तत्कालीन समाजाचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोनही या विवेचनात दिसून येतो. पुरुषांपेक्षा स्त्रीच्या चारित्र्याला महत्त्व, ती भित्री आणि कोमल स्वभावाची, स्वत:चे संरक्षण करण्यास असमर्थ ही पारंपारिक मतेच श्री. कृ. कोल्हटकरांसारख्या ‘सुधारक पक्षातल्या व्यक्तीने व्यक्त केली आहेत. हा काळाचाच महिमा मानावा लागतो. कोणत्याही नवीन सुधारणेच्या बाबतीत तत्त्व व प्रत्यक्ष व्यवहार यात फारकत दिसून येते. तसेच त्या काळच्या या प्रश्नाबाबत झालेले दिसते.

(२) सौ. काशीबाई हेरलेकर, बडोदे यांचे मत -

स्त्रीविषयक प्रश्नाचा उहापोह, याठिकाणी एका स्त्रीने केलेला आहे. त्यांच्या मते स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांनी केल्या तर त्या स्वाभाविकपणामुळे चांगल्या वठतील पण केवळ स्त्री म्हणून वाटेल त्या स्त्रीला स्त्रीभूमिका चांगल्या करता येणार नाहीत. स्वाभाविक गुण, सुशिक्षण, रहस्य समजण्याची शक्ती, रूप, ही असल्यावाचून स्त्रियांच्या हातून काम चांगले होणार नाही. सौ. हेरलेकर यांच्या मते समाजस्थिती ह्या सुधारणेला आज व पुढेही कित्येक वर्षे अनुकूल नाही. कला व नीती दोन्हीच्या दृष्टीने योग्य स्त्रिया असल्या तरच धंद्याची प्रतिष्ठा वाढेल, स्त्रियांनी रंगभूमीवर काम करण्याचा नीतिदृष्ट्या अनिष्ट उपयोग होण्याचा बराच संभव आहे. या धंद्यातील परिस्थिती अत्यंत नाजूक व चमत्कारिक असल्यामुळे कुलीनपणास धोका आहे. स्त्रियांच्या कलाकुशलतेपेक्षा त्यांच्या नीतिमत्तेचे महत्त्व समाजाला जास्त असल्यामुळे कुलीन स्त्रिया या धंद्याकडे वळणार नाहीत असे सौ. हेरलेकर यांना वाटते. नाट्यकलेच्या उन्नतीची आवश्यकता असली तरी सामाजिक दृष्ट्या स्त्रीवर्गाच्या नीतिमत्तेची किंमत केव्हाही अधिकच ठरणार व ते इष्टच आहे.

याचा अर्थ स्त्री आणि तिचे चारित्र्य हा प्रश्न समाजातील स्त्री व पुरुष दोघांनाही महत्त्वाचा वाटत होता आणि ते योग्यच आहे. पण पुरुषांच्या चारित्र्याच्या संदर्भात मात्र लेखिकेने स्पष्टपणे आपले मत नोंदविलेले नाही. या धंद्यात ‘ कुलीनपणास धोका आहे असे म्हणत असताना या धंद्यात पुरुष असल्यामुळे ह्या परिस्थितीला तेच जबाबदार आहेत हा विचार सुचलेला नाही किंवा व्यक्त केलेला नाही. स्त्रियांमध्ये शिक्षणाचा प्रसार झाल्यावर हा प्रश्न सुटेल असे त्या म्हणतात. पण खरे तर सुशिक्षण स्त्री व पुरुष दोघांनाही आवश्यक होते. ते त्या काळी मिळत नव्हते. त्यामुळे एकूण परिस्थिती गुंतागुंतीची होती असे दिसते.

(३) श्री. पु. रा. लेले यांनी याबाबत व्यक्त केलेले विचार

श्री. पु. रा. लेले म्हणतात, कलेच्या दृष्टीने स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांनी करणे केव्हाही जास्त चांगले. पुरुषांच्या स्त्रीभूमिकात व्यंग्ये असोत वा नसोत त्या स्त्रियांपेक्षा कमी दर्जाच्याच ठरतील. याला उत्तम प्रत्यंतर म्हणजे काही स्त्रियांनी पुरुषांच्या केलेल्या भूमिका हेच होय. बायकांचा उपयोग योग्य रीतीने केल्यास कलेची उन्नती होईल. धंद्याला प्रतिष्ठा

येण्याचा स्त्रियांच्या नाट्यकलेत शिरण्याशी काही संबंध नाही. नाटकांमध्ये कुमारिका व विधवा स्त्रियांनी भूमिका कराव्या असे मत श्री. लेले यांनी व्यक्त केले आहे.

(४) 'वृंदावनविहारी', बऱ्हाणपूर यांचे मत

'वृंदावनविहारी', बऱ्हाणपूर यांनी वर्ष ६, अंक ९/१०, १९१६ या अंकात स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांनी करू नयेत असे स्पष्ट मत मांडले आहे. याला आपली समाजस्थिती अनुकूल नाही. आपल्या समाजात स्त्री-पुरुष समानता कधीही येणार नाही असे मत मांडून लेखक म्हणतो, स्त्रियांना नाटकात घेतल्याने त्यांना त्यांच्या ''हक्काच्या बऱ्याच रजा' घ्याव्या लागतील व त्या योगाने नाटक मंडळ्यांना बराच पैसा खर्च करून त्रास सोसावा लागेल.

या विवेचनावरून पुरुषांचा स्त्रीकडे पाहाण्याचा दृष्टिकोन कसा होता ते कळते. खरे म्हणजे या सर्व मतमतांतरांचा अभ्यास समाजशास्त्रीय अंगाने करणे अधिक महत्त्वपूर्ण ठरेल. कारण हा मूळ प्रश्न कलेशी निगडित असण्यापेक्षा समाजजीवनाशी निगडित आहे. रंगभूमी नियतकालिकाच्या संपादकांनी त्या काळात या चर्चेला पद्धतशीरपणे तोंड फोडले, अनेकांना स्पष्ट मते व्यक्त करायला लावली हे विशेष आहे.

(५) गोविंद वासुदेव कानिटकर यांचे मत

या विषयासंबंधी याच अंकात श्री. गोविंद वासुदेव कानिटकर लिहितात की, नाट्यकलेच्या दृष्टीने नाटकात स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांनीच केल्या तर काही अंशी इष्ट आहे. परंतु नीतिदृष्ट्या तसे वाटत नाही. आपली समाजस्थिती या सुधारणेला अनुकूल नाही.

(६) श्री. शंकर बापूजी मुजुमदार यांचे मत

श्री. शंकरराव मुजुमदार हे बाराव्या नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी स्त्रिया नाटक धंद्यात शिरल्या तर अनेक प्रकारचे मोह आवरणे परस्परांना अशक्य होईल म्हणून हा प्रश्न सोडून द्यावा व या गोष्टीचा आणखी बरीच वर्षे तरी विचार करू नये अशी आग्रहाची सूचना केली आहे.

या खेरीज भारतनाट्यसमाजाच्या जवळजवळ प्रत्येक संमेलनाध्यक्षांनी या विषयावर आपापली मते मांडली आहेत. या भाषणांच्या एकत्रित आढाव्यात त्यांचा परामर्ष याच प्रकरणात पुढे घेतलेला आहे.